# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक ०३/०२/२०२५ (सोमवार) सकाळ

---

**जानेवारी २०२३ च्या तुलनेत जानेवारी २०२५ मध्ये रस्ते अपघातात २१ टक्क्यांनी घट आणि प्राणांतिक अपघातात १४ टक्क्यांनी घट नागपुर ग्रामीण पोलीसांचा अहवाल.**

दिनांक ०४/०२/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हा पोलसांनी एक महत्वपुर्ण अहवाल दिला आहे. ज्या मध्ये जानेवारी २०२५ मध्ये रस्ते अपघात आणि प्राणांतिक अपघातात घट, वाहतुक नियमांची अमंलबजावणी आणि सुरक्षा उपाययोजनां वर प्रकाश टाकला आहे.

**मुख्य मुददे.**

- २०२३मधील प्रथम खबरी महीती नुसार,एकुण रस्ते अपघातांचे प्रमाण जानेवारी २०२३ च्या तुलनेत २०२५ मध्ये ४३ वरून ३४ पर्यंत घसरले आहे (अपघाताच्या घटनेच्या तारखेनुसार). मागील दोन वर्षांमध्ये अपघातांचे प्रमाणात २१ टक्क्यांनी घट झाली आहे.
- प्राणांतिक अपघातात जनेवारी २०२३ च्या तुलनेत जानेवारी २०२५ मध्ये ४४ वरून ३८ पर्यंत घसरले आहे. प्राणांतिक अपघातात १४ टक्के घट दर्शविते.

**उच्च घातक रस्त्यांमध्ये (कॉरीडोअर्स) लक्षणीय सुधारणा**

- जास्त प्राणांतिक अपघात होणारे १८ उच्च घातक रस्त्यावर प्राणांतिक अपघाताचे प्रमाण जानेवारी २०२३ च्या तुलनेत जानेवारी २०२५ मध्ये २७ वरून १८ पर्यंत घसरले आहे. प्राणांतिक अपघातात मागील दोन वर्षात ३३ टक्क्यांनी घट झाली आहे.
- या अरूंद रस्त्यावरील अपघातात मृत्युंचे प्रमाण जानेवारी २०२३ च्या तुलनेत जानेवारी २०२५ मध्ये २८ वरून १९ पर्यंत घसरले आहे.अपघातात मृत्युंच्या प्रमाणात दोन वर्षात ३२ टक्कयांनी घट दर्शवित आहे.

या अहवालांबाबत बोलतांना मा.श्री. हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी सांगितले की,रस्त्यांवरील जिव घेण्या अपघतामध्ये झालेली ही घट नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांच्या कठोर अंमलबजावणीच्या प्रयत्नांचा पुरावा आहे, ज्यामध्ये वाहतुक नियमांचे पालन सुनिश्चित करणे आणि रस्ता सुरक्षा वाढविणे या वर भर होता.

रस्ता सुरक्षा वाढविण्यासाठी नागपुर ग्रामीण पोलसांनी १८ निवडक उच्च घातक रस्त्यांमध्ये शुन्य घातक (झिरो टॉलरेन्स) चा अंमलबजावणीचा दृष्टीकोण स्विकारला आहे.यामध्ये खालील प्रमाणे मुददे समाविष्ट आहे.

- वेगमर्यादिवर कठोर अंमलबजावणी
- हेलमेट आणि सिटबेल्ट अनुपालनाची अंमलबाजणी.
- दारू पिउन गाडी चालविणाऱ्यांवर कडक कारवाई.
- ट्रिपल सिट साठी नियम उल्लंघनासाठी दंडाची कठोर अंमलबजावणी.
- नागपुर ग्रामीण जिल्हयामध्ये अपघात आणि प्राणांतिक अपघाता साठी कारणीभुत असलेल्या इतर वाहतुक उल्लंघनाचे निराकरण करणे.

नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांनी सर्व रस्ता वापरकर्त्यांना रहदारीचे सर्व नियम पाळण्याचे,निष्काळजी पणे वाहण चालविणे टाळणे आणि रस्ता सुरक्षेला प्राधान्य देण्याचे आवाहन केले आहे. नागपुर ग्रामीण जिल्हयात या प्रगतीवर अतिरीक्त अंमलबाजवणी उपाय आणि सुरक्षा उपक्रम सुरूच राहतील आणि शुन्य घातक (झिरो टॉलरेन्स) दृष्टीच्या दिशेने कार्य करत राहतील.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**